# स्वा. सावरकर महाविद्यालय ,बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित कार्यक्रम अहवाल

### 1. मास्क व अत्यावशक वस्तु वाटप व जनजागृती

दि. 3 मे 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत मौजे कर्जनी या गावी मास्क व अत्यावशक वस्तु (किराणा सामान) वाटप करून कोविड 19 या आजाराबद्दल जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून सेवा योजना बीड जिल्हा समन्वयक प्राध्यापक डॉ. सोपान सुरवसे हे होते तसेच महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉ. अशोक डोके, प्राध्यापक डॉ. ओमप्रकाश झंवर व स्वयंसेवक, ग्रामस्थ व सरपंच श्री शिंदे उपस्थित होते उपस्थित होते.

### 2. मास्क व सॅनीटायझर चे वाटप

दिनांक 9 मे 2020 रोजी बीड शहरात भाजी बाजारात कोविड 19 /कोरोना या घातक आजाराबाबत जागृती करण्यात आली. त्याठिकाणी असलेले भाजी विक्रेते, शेतकरी, ग्राहक, बँक ग्राहक यांना मास्कचे व सॅनीटायझर चे वाटप करण्यात आले. सॅनीटायझर केंव्हा व कसे वापरायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. या कार्यक्रमात रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सोपान सुरवसे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अशोक डोके,प्रा. डॉ. ओमप्रकाश झंवर, प्रा. अनंत देशपांडे व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला.

### 3. योग व प्राणायाम शिबिर

दिनांक 21 जून 2020 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभाग स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीडच्या वतीने ऑनलाइन योगाभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात श्रीमती शर्मिष्ठा शेटे व श्री रत्नेश्वर शेटे यांनी योगासने व प्राणायाम याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर हे होते. कोरोना काळात आपली प्रतिकारक शक्ती उत्तम राहण्यासाठी

नियमित योगासने व प्राणायाम करणे याशिवाय पर्याय नाही असे मत त्यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले. या ऑनलाइन योगाभ्यास शिबिरात बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी स्वयंसेवक, प्राध्यापक व पालक यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कक्ष प्रमुख प्राध्यापिका डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अशोक डोके यांनी केले.

## 4. वृक्षारोपण कार्यक्रम

दिनांक 1 जुलै 2021 रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई चे सहकार्यवाह तसेच महाविद्यालयीन समितीचे अध्यक्ष प्राध्यापक चंद्रकांत मुळे, प्राचार्य डॉक्टर संजय शिरोडकर उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉक्टर राजेश ढेरे, कार्यक्रमाधिकारी डॉक्टर अशोक डोके, डॉक्टर ओमप्रकाश झंवर, प्रा. अनंत देशपांडे, डॉक्टर संगीता ससाने व इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना उपप्राचार्य डॉक्टर बाहेगव्हाणकर यांनी वृक्षारोपणाचे महत्व विशद केले व तसेच प्रत्येकाने जीवनात कमीत कमी दहा वृक्षांची लागवड करावी व त्यांची जोपासना करावी अशी इच्छा व्यक्त केली.

## 5. लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक 1 ऑगस्ट 2020 रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून बोलताना प्राध्यापक डॉक्टर अशोक डोके यांनी दोन्ही महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय शिरोडकर हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे, रासयो जिल्हा समन्वयक डॉक्टर सोपान सुरवसे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉक्टर सौ. संगीता ससाने यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर ओमप्रकाश झंवर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक अनंत देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

## 6. राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन

दिनांक 25 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉक्टर सोपान सुरवसे हे होते. डॉक्टर सोपान सुरवसे यांनी भारताच्या ग्रामीण विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान किती महत्वाचे आहे याचे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्य केल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू पडतात, विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव होते असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर संजय शिरोडकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागात त्यांनी विद्यार्थीदशेत घेतलेले अनुभव व केलेले कार्य यांना उजाळा दिला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राम गव्हाने यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले आणि आभार डॉ. संगीता ससाणे यांनी मानले.

## 7. म. गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती

दि. 2 ऑक्टोबर 2020 रोजी म. गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त प्रतिमा पूजन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संगीता ससाणे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. अनंत देशपांडे यांनी केले.

## 8. कोरोना जागृतीबाबत शपथ कार्यक्रम

कोविड 19 या जागतिक महामारीच्या पार्श्वभुमीवर या रोगाचा प्रसार रोखला जावा व जनतेमध्ये याबाबत जागरुकता निर्माण व्हावी या हेतूने भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालायच्या वतीने अभिनव उपक्रम राबविण्यात आला होता. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम 15 सप्टेंबर 2020 ते 25 ऑक्टोबर दरम्यान राबवली गेली. याचाच एक भाग म्हणून क्षेत्रीय संचालक, पुणे यांच्या

आदेशानुसार, दि. 8 ऑक्टोबर 2020 रोजी कोरोना जनजागृतीची सार्वजनिक शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर, उपप्रचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ. राजेश ढेरे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. सोपान सुरवसे, कार्यक्रमाधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर, प्रा. अनंत देशपांडे , डॉ. सौ. संगीता ससाणे हे महाविद्यालयात उपस्थित होते तर इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी गूगल मीट च्या माध्यमातून ऑनलाइन सहभाग नोंदवला.

### 9. परिक्षार्थींना मास्कचे वाटप

दिनांक 13-10-20 रोजी कोविड-19 च्या पार्श्वभूमि वर परीक्षार्थी ना मांस्कचे वाटप केले त्याच बरोबर ऑक्सीजन तपासणी व सॅनीटायझरने हाताची स्वच्छता करण्यात आली . या प्रसंगी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ संजयजी शिरोडकर उप-प्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर राष्ट्रीय सेवा योजना जिला समन्वयक डॉ सोपानजी सुरवसे कार्यक्रम अधिकारी डॉ ओमप्रकाश बन्सीलाल झंवर डॉ संगीता ससाणे , प्राध्यापकगण स्वयंसेवक तसेच परीक्षार्थी उपस्थित होते .

### 10. जागतिक हात धुवा दिवस

दिनांक 15 -10-2020 रोजी जागतिक हाथ धुवा दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ संजयजी शिरोड़कर, प्रमुख पाहुणे श्री रविंद्र मनोहर खोड, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगांवकर उपप्राचार्य डॉ राजेशजी ढेरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर व डॉ. संगीता ससाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते . या प्रसंगी नियमित हात धुण्याचे काय फायदे आहेत ते विद्यार्थ्यांना सांगण्यात आले तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने हात कसे धुवावेत याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

### 11. वाचन प्रेरणा दिन साजरा

राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय या विभागाच्या वतीने महाविद्यालयात दिनांक 15 ऑक्टोबर 2020 रोजी भारताची अकरावे राष्ट्रपति स्वर्गीय डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिन वाचन प्रेरणा दिनाच्या स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, प्रमुख पाहुणे श्री.रविद्र मनोहर खोड, श्री लक्ष्मणराव जाहेर पाटिल विद्यालय नामलगांव फाटा, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर

व डॉ. राजेशजी ढेंरे, ग्रंथपाल डॉ.अनुजा कास्तीकर, राष्ट्रीय सेवा योजना चे कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर व डॉ. संगीता ससाणे उपस्थित होते.

## 12. राज्यपाल महोदयाच्या संदेशाचे वाचन

दिनांक 27-10-2020 रोजी माननीय राज्यपाल महोदय यानी दिलेल्या सतर्कता जागरूकता सप्ताह या संदर्भातील सत्यनिष्ठ प्रतिज्ञेचे सामुदाइक वाचन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजयजी शिरोडकर, राष्ट्रीय सेवा योजनाचे जिल्हा समन्वयक डॉ सोपान सुरवसे, कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर, डॉ. संगीता ससाने व प्रा. अनंत देशपांडे , विद्यार्थी स्वयंसेवक आदी  उपस्थित होते.

## 13. संविधान दिन

दि. 26 नोवेंबर 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत संविधान दिन साजरा करण्यात आला.  या प्रसंगी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुदाइक वाचन करण्यात आले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह नितिनजी शेटे तर प्रमुख पाव्हणे सहकार्यवाह प्रा. चंद्रकांतजी मुळे हे होते. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापक गण व विद्यार्थी उपस्थित होते.

## 14. महापरिनिर्वाण दिन

दि. 6 डिसेंबर 2020 रोजी महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, उपप्रचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व डाँ. राजेशजी ढेंरे, सर्व  कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## 15.  गुरु व शनि ग्रहांची विलोभनीय स्थितीचे निरीक्षण

दि. 23 डिसेंबर 2020 रोजी रासयो वभुगळ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने  गुरु व शनि ग्रहांची अवकाशातील विलोभनीय स्थितीचे दुरबिनीद्वारे निरीक्षण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. महाविद्यालयातील प्रधायपक, विद्यार्थी, महाविद्यालय परिसरातील नागरिक यांनी या संधीचा लाभ घेतला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, उपप्रचार्य डॉ लक्ष्मीकांत

बाहेगव्हाणकर व डॉ. राजेशजी ढेंरे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. अशोक डोके , डॉ. जोगेंद्र गायकवाड, रासयोचे सर्व कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### 16. एच. आय.व्ही. तपासणी व रक्तदान शिबिर

23/12/2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वा. सावरकर महाविद्यालय बीड व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष व ICTC जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने HIV/एड्स जनजागृती व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात युवकांनी मोठा प्रतिसाद देऊन स्वतः ची HIV तपासणी करून घेतली व रक्तदान ही केले. सदरील शिबिरात जिल्हा रुग्णालयातील ICTC समुपदेशक श्री. जनार्धन माचपल्ले यांनी युवकांना मार्गदर्शन केले व प्रयोगशाळा तंत्रज्ञ महादेव इंगळे यांनी HIV तपासणी करून अहवाल दिला. या कार्यक्रमाला जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे, रक्त संक्रमण अधिकारी श्रीमती जयश्री बांगर, रक्त संक्रमण अधिकारी श्रीमती रेश्मा गवते, रक्तपेढी तंत्रज्ञ श्री. अमोल हवळे, सहाय्यक श्री. नरसिंग मामा कोकंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ राजेशजी ढेरे, जिल्हा समन्वयक डॉ सोपान सुरवसे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.ओमप्रकाश झंवर, डॉ.संगीता ससाणे व प्रा.अनंत देशपांडे तसेच अन्य प्राध्यापक गण, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

### 17. जिल्हा युवा पार्लमेन्ट सहभाग

दि. 27 डिसेंबर 2020 रोजी नेहरु युवा केंद्र बीड च्या वतीने आयोजित . जिल्हा युवा पार्लमेन्ट 2020 मध्ये महाविद्यालयाच्या अकरा विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग घेतला.

### 18. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. 12 जानेवरी 2021 रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती निमित्ताने प्रतिमा पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ राजेशजी ढेरे, जिल्हा समन्वयक डॉ सोपान सुरवसे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.ओमप्रकाश झंवर, डॉ.संगीता ससाणे व प्रा.अनंत देशपांडे तसेच अन्य प्राध्यापक गण, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## 19. विद्यापीठ नामविस्तार दिन

दिनांक 14 जानेवारी 2021 रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर हे होते तर प्रमुख वक्ते हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्रजी सोनवने हे होते. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ राजेशजी ढेरे, अधिक्षक डॉ. प्रशात तालखेडकर कार्यक्रम अधिकारी डॉ ओमप्रकाश झंवर, डॉ.संगीता ससाणे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश झंवर यानी केले अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर यांनी केला व आभार प्रा. अनंत देशपांडे यानी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी डॉ. संगीता ससाणे यानी केले.

## 20. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि.24 जानेवारी 2021 रोजी महाविद्यालयात महानायक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची 125 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी ओयजित कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासयोचे जिल्हा समन्वयक डॉ सोपान सुरवसे हे होते. व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत देशपांडे, डॉ. संगीता ससाणे, कार्यालईन अधीक्षक डॉ. प्रशांत कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रमुख वक्ते डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की स्वा. सावरकरांच्या प्रेरणेतून सुभाषबाबुनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. देशाच्या बाहेर जाऊन भारतीय स्वातंत्र्याची योजना आखली. अंदमानवर हल्ला करून तिरंगा फडकवला. नेताजींचे जीवन संघर्षमय होते. युवकांनी सैन्यात भारती व्हावे असे आव्हान त्यांनी केले होते. एव्हडेच नाही तर त्यांनी आझाद हिंद सेनेच्या महिला बटालियनची स्थापना केली होती. भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पटलावर मांडून इतर देशांच्या मदतीने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले तर आभार डॉ. संगीत ससाणे यांनी मानले.

## 21. रस्ता सुरक्षा अभियान

दि. 30 जानेवारी 2021 रोजी रस्ते सुरक्षा अभियाना अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून गोपनीय शाखेचे पोलिस अधीक्षक श्री. रामराव

आघाव हे होते. आपण नियमांचे पालन केले, सुरक्षित प्रवास केला तर अपघात होणार नाहीत, कोणाचे प्राण जाणार नाहीत, सडक सुरक्षा हीच जीवन रक्षा आहे असे प्रतिपादन त्यांनी बोलताना केले. या प्रसंगी वाहतूक पोलीस शाखेचे सय्यद अशफाक यांनी वाहतूक नियमांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नेहमी नियमांचे पालन करण्याचा आग्रह केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर, जिल्हा समन्वयक डॉ. सोपान सुरवसे, कार्यालयीन अधिक्षक डॉ. प्रशांत तालखेडकर यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेने प्रकाशित केलेल्या प्रेरक बापू या पुस्तिकेचा उल्लेख करत स्वच्छता, स्वावलंबन आणि स्वदेशी या गांधीजींच्या त्रिसूत्रीचा अवलंब करणे गरजेचे आहे, असे सांगून रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती करण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ संगीता ससाने यांनी केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## 22. मतदार जागृती अभियान

दिनांक 10 फेब्रुवारी 2021 राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लोकशाही पंधरवाडा व राष्ट्रीय मतदार जागृती अभियान अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर हे होते, तर प्रमुख प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार संदीप बेदरे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी सांगितले की मतदार हा लोकशाहीमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक आहे. देशाचे भवितव्य घडवण्याचे सामर्थ्य मतदारांमध्ये आहे. ज्या विद्यार्थ्यांचे 18 वर्षे वय पूर्ण झाले आहे अशा विद्यार्थ्यांनी मतदार नाव नोंदणी करून मतदार व्हावे. प्रमुख अतिथी संदीप बेदरे यांनी सांगितले की मतदारांच्या हातात देशाची सत्ता असते ते लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.

संजय शिरोडकर म्हणाले की भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात मतदान आणि मतदाराला विशेष महत्त्व आहे. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे, मतदान केल्याने लोकशाही सुदृढ होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. संगीता ससाने यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मतदार जागृती अभियान संबंधित जनजागृती पत्रकांचे वाटप करण्यात आले.

### 23. संत सेवालाल जयंती

दिनांक 15 फेब्रुवारी 2021 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत सेवालाल रांची 282 वी जयंती प्रतिमा पूजन करून साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ संजयजी शिरोडकर, उपप्राचार्य डॉ. राजेशजी ढेरे कार्यक्रम अधिकारी डॉ ओमप्रकाश झंवर डॉ.संगीता ससाणे व प्रा.अनंत देशपांडे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

### 24. छत्रपती शिवाजी महाराज जयंती

दि. 19 फेब्रुवारी 2021 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती प्रतिमा पुजन करून साजरा करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे, कार्यक्रम अधिकारी डॉ.ओम प्रकाश झंवर ,जिल्हा समन्वयक डॉ. सोपान सुरवसे, डॉ. संगीता ससाणे उपस्थित होते.

### 25. राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती

दिनांक 23 फेब्रु. 2021 रोजी महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर, उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत वाहेगांवकर, डॉ राजेशजी देरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर प्रा. अनंत देशपांडे डॉ..संगीता सासाणे, शिंक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

## 26. स्वा. सावरकर आत्मार्पण  दिन

दिनांक 26 फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा आत्मार्पण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई चे सहकार्यवाह प्राध्यापक चंद्रकांत मुळे हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून सावरकर संकुलाचे कार्यवाह श्री मिलिंद चिंचपूरकर व प्राथमिक विभागाचे अध्यक्ष श्री प्रमोद कुलकर्णी हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयातील सावरकरांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात सावरकर अभ्यास केंद्राच्या वतीने घेण्यात आलेल्या सावरकर चरित्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले तसेच बारावी वर्गातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'अनादी मी अनंत मी' या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात सहकार्यवाह प्रा. चंद्रकांत मुळे यांनी सावरकरांचा त्याग, देशभक्ती यातून युवकांनी प्रेरणा घ्यावी असे मत व्यक्त केले . राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ संजयजी शिरोडकर, उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे, अधीक्षक डॉ. प्रशांत कुलकर्णी, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

## 27 . मराठी भाषा गौरव दिन साजरा

दिनांक 27/2/2021 रोजी मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने  मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे अध्यक्ष  महाविद्यालयचे प्राचार्य डॉ संजयजी शिरोडकर, प्रमुख वक्ते मराठी भाषा विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ सोपान सुरवसे, उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर , उपप्राचार्य डॉ. राजेशजी ढेरे, कार्यक्रम अधिकारी डॉ ओमप्रकाश झंवर,  प्रा.अनंत देशपांडे, डॉ. संगिता ससाणे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित  होते. हा कार्यक्रम कोविड-19 चे सर्व नियमाचे पालन करून साजरा करण्यात आला या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य संजयजी शिरोडकर यांनी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील समृद्ध वारसा जापावा . तसेच मराठीला अभिजात

भाषेचा दर्जा मिळण्यासाठी शासन ,सामान्य नागरिक, साहित्यिक आणि मराठी भाषा प्रेमी यांनी एकत्रित प्रयत्न करावेत असे आवाहन केले. प्रमुख वक्ते मराठी विभाग प्रमुख डॉ. सुरवसे यांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या मराठी भाषेतील साहित्यिक योगदानाचा आलेख विद्यार्थ्यांसमोर सादर केला. मराठी ही राजभाषा असून मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली . मराठी भाषेचा समृद्ध वारसा आपण सर्वांनी जपावा. मराठी भाषेतील एकूण चार साहित्यिक ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहेत. वि.वा शिरवाडकर हे एक श्रेष्ठ लेखक, कलावंत आहेत .या कार्यक्रमात महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी मराठी भाषेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. चि. आदित्य वीर , कुमारी पूजा पांडव ,कुमारी गौरी देशपांडे ,कुमारी अमृता दानी, कुमारी दीपाली कुलकर्णी, कुमारी कोमल दुग्गड यानी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ओमप्रकाश झंवर यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रा. राम गव्हाणे, तत्वज्ञान विभाग प्रमुख यांनी आभार मानले.

### 28 . जागतीक महिला दिन चर्चासत्र व ऑनलाइन महिला पालक मेळावा

दिनांक 8 मार्च 2021 रोजी महिला दिनानिमित्त सावरकर महाविद्यालयात चर्चासत्र व ऑनलाइन महिला पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून भौतिक शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. स्वाती कुलकर्णी या होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे यांची उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानात डॉ.स्वाती कुलकर्णी यांनी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या कार्याची माहिती दिली व यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्य मधील महिलांचे योगदान यासंदर्भात आपले विचार मांडले. या प्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कृष्णा बरटक्के यांनी ‘ कोरोंना संवृक्षणात्मक आणि प्रतिबंधात्मक उपाय “ या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. संगीता ससाणे यांनी मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका, कर्मचारी यांचे महिला दिनानिमित्त पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व महिला पालक यांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला. जागतिक महिला दिनानिमित्त

विद्यार्थिनींनी तयार करण्यात आलेल्या भीती पत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### 29 . निबंध स्पर्धा

दिनांक 13 मार्च 2021 रोजी केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या सूचनेनुसार भारतीय स्वातंत्र्याची 70 वर्षे – आझादी का अमृत महोत्सव- या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात विविध विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेतमधे 25 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुनीता कुरुडे यांनी केले.

या स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते

1) 1857 चा उठाव

2) मिठाचा सत्याग्रह

3) स्वदेशी आंदोलन

4) भारत छोड़ो आंदोलन

5) जालियांवाला बाग हत्या कांड

### 30. भारतीय स्वातंत्र्य लढा –वेबीनार

दिनांक 14 मार्च 2021 रोजी, केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या सूचनेनुसार भारतीय स्वातंत्र्याची 70 वर्षे – आझादी का अमृत महोत्सव- या उपक्रमांतर्गत वेबीनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. कालिदास चिटणीस, इतिहास विभाग प्रमुख, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई हे होते तर अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर हे होते. या कार्यक्रमाला भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश झंवर, सूत्रसंचलंन डॉ. संगीत ससाणे व आभार प्रदर्शन प्रा. अनंत देशपांडे यांनी केले.

## 31. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची

दिनांक 12 एप्रिल 2021 रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती प्रतिमा पूजन करून साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर , उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांतजी बाहेगव्हाणकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर, प्रा. अनंत देशपांडे डॉ. सौ. संगीता ससाणे महिला कक्ष प्रमुख डॉ.सौ. स्वाति कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## 32. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दिनांक 14 एप्रिल 2021 रोजी महामानव, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. संजयजी शिरोडकर , उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांतजी बाहेगव्हाणकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. ओमप्रकाश झंवर, प्रा. अनंत देशपांडे, डॉ. सौ. संगीता ससाणे व इतर प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिवादन केले.